# आकाशवाणी मुंबई

राज्य विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला प्रारंभ झाला आहे. सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात प्रचंड चुरस निर्माण झाली आहे. याशिवाय अपक्ष लढणारे उमेदवार आणि इतर पक्षांचे उमेदवार यांच्या कामगिरीवरही राज्यातल्या सत्तास्थापनेची समीकरणं अवलंबून आहेत. राज्यातल्या २८८ मतदारसंघांमधे प्रत्येकी एक याप्रमाणे मतमोजणी केंद्र असून केंद्रांभोवती कडेकोट सुरक्षा बंदोबस्त आहे. विधानसभा निवडणुकीचं विश्लेषण करणारा विशेष कार्यक्रम निवाडा जनतेचा या बातमीपत्रानंतर प्रसारित होणार आहे. सुरुवातीचे कल हाती येऊ लागले आहेत.

**<><><><><>**

आतापर्यंत १७७ जागांचे कल हाती आले आहेत. त्यात सर्वाधिक ६१ जागांवर भाजप आघाडीवर आहे. दहिसर मतदार संघात मतमोजणीच्या पहिल्या फेरीअखेर  भाजपच्या उमेदवार मनिषा चौधरी त्यांच्या निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाचे विनोद घोसाळकर यांच्या पेक्षा १ हजार ६२३  मतांनी आघाडीवर आहेत.

**पालघर** मतदार संघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीअखेर  शिवसेनेचे उमेदवार राजेंद्र गावित, त्यांचे  निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जयेंद्र दुबळा यांच्या पेक्षा १०२ मतांनी आघाडीवर आहेत.

**मावळ** मतदार संघात मतमोजणीच्या पाचव्या  फेरीअखेर राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सुनील शेळके, त्यांचे  निकटचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे बापूसाहेब भेगडे यांच्या पेक्षा १९ हजार ६९३ मतांनी आघाडीवर आहेत.

**संगमनेर** मतदार संघात मतमोजणीच्या तिसऱ्या फेरीअखेर काँग्रेसचे बाळासाहेब थोरात ६ हजाराहून अधिक मतांनी पिछाडीवर आहेत.

**चिपळूण** मतदार संघात मतमोजणीच्या चौथ्या फेरीअखेर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रशांत बबन यादव त्यांचे  निकटचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेसचे शेखर गोविंदराव निकम यांच्या पेक्षा ७५२ मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात झाली असून काही मतदारसंघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीला सुरुवात झाली आहे. अनेक मतदारसंघात महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या उमेदवारांनी  आघाडी घेतली आहे. दुसऱ्या फेरी अखेर नवापूरमधून शिरीष नाईक आघाडीवर आहेत. जळगाव जामोदमधून स्वाती वाकेकर, साक्रीमधून प्रवीण चौरे, रावेरमधून धनजंय चौधरी, धारावीमधून ज्योती गायकवाड, अक्कलकुवामधून के सी पाडवी, शहादामधून राजेंद्रकुमार गावीत, अंधेरी पश्चिममधून अशोक जाधव हे काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत.

गुहागरमधून भास्कर जाधव, वाशिममधून सिद्धार्थ देवळे, उमरगामधून प्रवीण स्वामी, बाळापूरमधून नितीन देशमुख, औरंगाबाद पश्चिममधून राजू शिंदे हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार आघाडीवर आहेत.

चिपळूण मतदारसंघातून प्रशांत यादव, चेंबुरमधून फहाद अहमद, सिंदखेड राजामधून राजेंद्र शिंगणे, जिंतूरमधून विजय भांबळे, सिन्नरमधून उदय सांगळे, इस्लामपूर जयंत पाटील, शिराळ्यातून मानसिंग नाईक हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आघाडीवर आहेत.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या टपाली मतमोजणीला विविध केंद्रांवर सुरुवात झाली आहे. **पुणे जिल्ह्यातल्या** वडगाव शेरी विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे सुनील टिंगरे, कसबा मतदारसंघातून भाजपचे हेमंत रासने, हडपसर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे चेतन तुपे तर कोथरूड विधानसभा मतदारसंघातून भाजपचे चंद्रकांत पाटील हे टपाली मतमोजणीत आघाडीवर आहेत.

**जळगाव ग्रामीण**मधून शिवसेनेचे गुलाबराव पाटील आघाडीवर आहेत. नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे माणिकराव कोकाटे आघाडीवर आहेत.

बारामती विधानसभा मतदारसंघात अजित पवार टपाली मतमोजणीत आघाडीवर आहेत. पुरंदर मधून शिवसेनेचे विजय शिवतारे, आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून शरद पवार पक्षाचे देवदत्त निकम आघाडीवर आहेत. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातून भाजपचे सुनील कांबळे टपाली मतदानाच्या पहिल्या फेरीत आघाडीवर आहेत.

मुंबई उपनगरातील वांद्रे पूर्व इथून राष्ट्रवादी काँग्रेसचे झिशान सिद्दीकी, कुलाब्यातून भाजपचे राहुल नार्वेकर, वाशीम जिल्ह्यातून भाजपचे श्याम खोडे तर गुहागरमधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भास्कर जाधव आघाडीवर आहेत.

**नंदूरबार** जिल्ह्यात नवापूर विधानसभा मतदारसंघात टपाली मतदानात काँग्रेसचे शिरीष नाईक आघाडीवर आहेत. कोल्हापूर उत्तरमधून शिवसेनेचे राजेश क्षीरसागर आघाडीवर आहेत. **नागपूर दक्षिण पश्चिम** विधानसभा मतदार संघात होत असलेल्या टपाली मतमोजणीत देवेंद्र फडवणीस आघाडीवर आहेत. **वाशिम** विधानसभा मतदारसंघात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सिद्धार्थ देवळे आघाडीवर

आहेत. तर कारंजा विधानसभा मतदारसंघात टपाली मतमोजणीत भाजपच्या सईताई डहाके आघाडीवर आहेत.

//<><><><><>//